महाराष्ट्र शासन

**प्रवेश नियामक प्राधिकरण**

३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी,
अली यावर जंग मार्ग, बांद्रे, मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी : ०२२ - २६४७ ६०३७ वेबसाईट : sspnsamiti.gov.in
फॅक्स : ०२२ - २६४७ ६०३७ ईमेल : sspnsamiti@yahoo.com


क्र. संकिर्ण-१६१७/प्र.क्र.२२९(१)/प्रनिप्रा दिनांकः ५ ऑक्टोबर २०१७

प्रति,
प्राचार्य/अधिष्ठाता,
विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन सादर करणेबाबत ...

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.संकिर्ण-१६१७/प्र.क्र.१२९/प्रनिप्रा, दि.४/१०/२०१७

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधित संचालकांकडून प्रमाणित करुन विहित वेळेत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

२. तत्पुर्वी, महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधिल पदव्युत्तर/पदवी/पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.sspnsamiti.gov.in व www.pnsamiti.com या संकेतस्थळावर विहीत प्रपत्रात **दि. ९ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत प्रक्रिया शुल्कासहीत ऑनलाईन** सादर करावयाची आहे.

३. विहित मुदतीत प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन सादर न केल्यास विहीत दंडात्मक कारवाई करण्यात येईल अथवा सदर महाविद्यालयातील प्रवेशांना मान्यता देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(अशोक चौधरी)**
**कक्ष अधिकारी,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण**

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित, -

१. सर्व संचालक, तंत्रशिक्षण/उच्चशिक्षण/वैद्यकिय शिक्षण/कलाशिक्षण/आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना त्यांच्याशी निगडीत विहीत प्रपत्राच्या प्रतीसह अग्रेषित
२. मे. विशुमंगल टेक्नोलॉजी प्रा. लि. पुणे यांनी विहीत केलेल्य कालावधीनुसार उचित कार्यवाही करावी.
३. निवड नस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण